दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १०५ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.९ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.
Scan QR code to visit... Epaper Portal

# खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांना यंदाचा संसदरत्न पुरस्कार जाहीर

## कल्याण लोकसभा मतदारसंघासाठी केलेल्या कामगिरीची दखल

**मुंबई**–शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांना यंदाचा संसद रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. १७ व्या लोकसभेत त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. खासदार श्रीकांत शिंदे हे १७ व्या लोकसभेतील सर्वोत्कृष्ट कामगिरी असलेल्या पाच सदस्यांपैकी एक ठरले आहेत. २०१९ ते २०२३ या कार्यकाळात श्रीकांत शिंदे यांनी ५५६ प्रश्न उपस्थित केले आहेत. ६७ चर्चांमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे आणि १२ खाजगी विधेयक त्यांनी मांडली आहेत.आतापर्यंत अनेक महत्त्वाच्या आणि सर्वसामान्यांच्या दृष्टीने गरजेच्या मुद्द्यांवर डॉ. शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. कल्याण लोकसभा मतदारसंघातही पायाभूत सुविधा उभारण्यापासून सर्वच टप्प्यांवर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली आहे. त्यांच्या याच कामगिरीची दखल घेऊन त्यांना यापूर्वी अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. २०१४ च्या लोकसभेत निवडून आलेले डॉ. श्रीकांत शिंदे हे तरुण खासदारांपैकी एक खासदार होते. २०१९ च्या निवडणुकीतही डॉ. श्रीकांत शिंदे मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ते सुपुत्र आहेत.केंद्रीय मंत्री, निवडणूक आयोगाचे माजी सहसंचालक यांसारखे अनेक सदस्य या पुरस्कारासाठी नावांची शिफारस करत असतात. हा एक प्रकारचा नागरिक सन्मान समजला जातो. लोकसभा आणि राज्यसभा यातील कामकाजामध्ये घेतलेला सहभाग, उपस्थित केलेले प्रश्न, मांडलेले प्रस्ताव, संसदेतील उपस्थिती आणि एकूण कामगिरीबद्दल हे पुरस्कार दिले जातात. यंदाचा हा पुरस्कार कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीकांत एकनाथ शिंदे यांना जाहीर झाला आहे.१९९९ या वर्षात स्थापन झालेल्या प्राईम पॉइंट फाउंडेशन या एनजीओला डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी संसद रत्न पुरस्काराबाबत सूचना केल्या होत्या. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या निर्देशावरून २०१० पासून लोकसभेतील आणि राज्यसभेतील सदस्यांना त्यांच्या उत्तम कामगिरीबद्दल संसद रत्न पुरस्कार देण्यात येतो. दरवर्षी संसद रत्न पुरस्कार प्रदान केला जातो. तर संसद महारत्न पुरस्कार दर पाच वर्षातून एकदा दिला जातो.



# चंद्रपूर प्रकल्पातील खेळाडूंची राज्यस्तरावर उंच भरारी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभाग, नाशिक अंतर्गत शासकीय व अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा ७ ते ९ जानेवारी २०२४ ला गरुडझेप अकॅडमी, नाशिक येथे संपन्न होत आहे. या स्पर्धेसाठी नागपूर विभाग अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर येथील देवाडा, बोर्डा, तोहोगाव, सुब्बई, जानाळा, देलनवाडी, डोंगरगाव, सरडपार, राजुरा, भारी, दुर्गापूर या शाळेचे ९ मुली व १८ मुले असे एकूण २७ खेळाडूंनी कब्बड्डी, खो- खो,व्हॅलीबाल, हॅन्डबाल, वैयक्तिक खेळ प्रकारात राज्यस्तरावर उंच भरारी घेतली असून सर्व खेळाडू नाशिकला रवाना झाले आहेत.दरवर्षी शालेय व आदिवासी विभागाच्या क्रीडा स्पर्धेत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातील विद्यार्थी सहभाग घेतात. विभाग व राज्य स्तरावर आपल्या प्रकल्पाचे नाव उंच करतात. खेळ, सांस्कृतिक, व शैक्षणिक क्षेत्रात चंद्रपूर प्रकल्प अग्रेसर आहे, या स्पर्धेसाठी क्रीडा व्यवस्थापक, क्रीडा



नियोजनसाठी सुरेश श्रीरामे, उमेश कडू, किशोर चिंचोलकर, सुनिता हतिमारे, श्रीहरी आत्राम, वर्षा मडावी हे सर्व कर्मचारी नाशिक येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी रवाना झाले आहे.वरील स्पर्धेसाठी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी मुरुगानंथम एम., टिंगूसले, बोंगीरवार, धोटकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी पोड, कुळसंगे, चव्हाण, कुतरमारे तसेच प्रकल्प कार्यालयाचे सर्व कर्मचारी व शासकीय, तथा अनुदानित शाळेचे मुख्याध्यापक व सर्व कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे कौतुक केले आहे.

# खेमजई येथे सावित्रीबाई फुले जयंती निमित्त दिनदर्शिका प्रकाशन

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील खेमजई येथे ग्रामपंचायतच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने दिनदर्शिका प्रकाशन व पथनाट्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद गंपावार, सामाजिक कार्यकर्ते शेगांव (बु.) तर प्रमुख मार्गदर्शक डॉ. पुरुषोत्तम कालभूत माजी प्राचार्य, आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा,डॉ. सतीश अघडते, पशुधन विकास अधिकारी, खेमजई,अविनाश मेश्राम, ठाणेदार शेगाव,कन्हैयालाल जयस्वाल,मनीषा चौधरी, सरपंच खेमजई, चंद्रहास मोरे, उपसरपंच, बाळकृष्ण बलकी, मुख्याध्यापक, वाघमारे सर, जि. प. शाळा खेमजई, विश्वनाथ तुराणकर, शंकर धोत्रे, मंगला भेले, इत्यादी उपस्थित होते. दरवर्षी प्रमाणे मान्यवरांचे हस्ते दिनदर्शिका प्रकाशन करण्यात आली. दिनदर्शिका लोकसहभागातुन छपाई करुन संपूर्ण गावात मोफत वाटप करण्यात आली.डॉ.कालभूत सर यांनी आपल्या



भाषणात राष्ट्रीय सेवा योजना व सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवन कार्यावर माहिती दिली तर डॉ गंपावार यांनी खेमजाई येथिल नावीन्य उपक्रमाबाबत कौतुक केले.यावेळी रविंद्र साखरकर, भीमराव पाटील व पुजा नन्नावरे यांचा ग्रामपंचायत खेमजई वतीने शाल, ग्रामगिता व दिनदर्शिका देऊन सत्कार करण्यात आला.रात्री लोक कला मंच भद्रावती यांनी स्त्री चळवळीवर नाटक सादर केले.सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रहास मोरे, संचालन संजू जांभुळे, आभार ईश्वर टापरे यांनी केले.

# ‘चांदा ग्रो’ च्या माध्यमातून जिल्ह्यात प्रथमच उघडले कृषी विकासाचे नवे दालन

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची संकल्पना आणि प्रशासनाचे सुक्ष्म नियोजन

### खिचडीच्या विश्वविक्रमासह १३ लाखांचे आकर्षक बक्षीस वाटप;लकी ड्रा मधून पंढरी गोंडेला ट्रॅक्टर तर विशाल बारेकरला बुलेट









**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शेतकरी समृध्द आणि आत्मनिर्भर झाला तरच देश प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर होईल, ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात दि.३ ते ७ जानेवारी दरम्यान चांदा ग्रो - २०२४ चे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले. पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे जिल्ह्यात प्रथमच या माध्यमातून कृषी विकासाचे नवे दालन शेतक-यांना उपलब्ध झाले. विशेष म्हणजे जिल्हा प्रशासनाचे सुक्ष्म नियोजन, खिचडीचा विश्वविक्रम आणि शेतक-यांना १३ लाखांचे आकर्षक बक्षीस वाटपाचे पाच दिवसीय कृषी महोत्सवाचा रविवारी समारोप करण्यात आला.

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थान यंत्रणा (आत्मा), कृषी विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमाने चांदा क्लब ग्राऊंडवर जिल्हा कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला होता. दि. ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून या कृषी महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. पाच दिवसीय या कृषी महोत्सवात दररोज किमान १२ ते १४ हजार याप्रमाणे अंदाजे ६० हजार नागरिकांनी उपस्थिती दर्शविली, तर २५ हजार जणांनी यात नोंदणी केली.

पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून १३ लाखांचे आकर्षक बक्षीस वाटप : जिल्हा कृषी महोत्सवात नोंदणी केलेल्या शेतक-यांसाठी लकी ड्रॉ च्या माध्यमातून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून व्यक्तिश: १३ लाखांचे आकर्षक बक्षिसांचे वाटप करण्यात आले. यात प्रथम क्रमांकाचे मिनी ट्रॅक्टर विजेता कोरपना तालुक्यातील वडगाव खिराडी येथील पंढरी गोंडे तर द्वितीय क्रमांकाची बुलेट विजेता उर्जानगर येथील विशाल बारेकर ठरले. याव्यतिरिक्त तिस-या क्रमांकाचे पॉवर टिलर शेणगाव (ता. जिवती) येथील तुकाराम कपडे यांना, चवथ्या क्रमांकाचे पॅडी वीडर नंदोरी (ता. भद्रावती) येथील प्रशांत अहीरकर यांना तर पाचव्या क्रमांकाचे पावर वीडर आमडी (ता. बल्लारपूर) येथील सुभाष तेलतुंबडे यांना मिळाले. याशिवाय पाच विजेत्यांना चाप कटर, पाच विजेत्यांना भाजीपाला किट, १० विजेत्यांना पॉवर स्प्रेअर, पाच जणांना आटा चक्की अशी बक्षीसे देण्यात आली. यावेळी उपस्थित असलेल्या शेतक-यांचासुध्दा सन्मान करण्यात आला. प्रथमच लकी ड्रॉ च्या माध्यमातून शेतक-यांना आकर्षक बक्षीसे मिळाल्याने शेतक-यांनी पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांचे आभार मानले.

**७ हजार किलो पेक्षा अधिक खिचडीचा विश्वविक्रम॰ :** आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी चंद्रपूर येथील कृषी महोत्सवात ७ हजार किलोपेक्षा जास्त तृणधान्यांची खिचडी बनवून विश्वविक्रम नोंदविला. ही खिचडी शाळांमध्ये तसेच शहरातील वस्त्यांमध्ये वाटण्याची व्यवस्था केली. तसेच कृषी प्रदर्शनाच्यास्थळी विविध स्टॉलवर असलेल्या प्रत्येक माणसाला आणि शहरातील ३५ हजार लोकांपर्यंत ही खिचडी पोहोचेल, अशी व्यवस्था जिल्हा प्रशासनाने केली.

**बळीराजा समृद्धी मार्ग शेतपाणंद रस्ते अभियानाचा शुभारंभ:** जिल्हा कृषी महोत्सवात ‘बळीराजा समृद्धी मार्ग शेतपाणंद रस्ते’ अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यात ५००१ कि.मी. चे शेतपाणंद रस्ते तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये मातीकाम पूर्ण झालेले २०५५ कि.मी. चे रस्ते, मातीकाम सुरू असलेले ४०५ कि.मी. चे रस्ते आणि नव्याने प्रस्तावित ३१८२ कि.मी.चे मुरमीकरणाचे शेतपाणंद रस्ते आणि मुरमीकरण झालेले परंतु खडीकरण बाकी असलेले इतर रस्ते सुरू करण्यात येतील.

**मिशन जयकिसान अभियानाचा शुभारंभ :** कृषी क्षेत्रात चंद्रपूर जिल्हा एक मॉडेल बनावा, या भागातील शेतकरी संपन्न व्हावा, शेतीसह कृषीपूरक उद्योगाला जिल्ह्यात चालना मिळावी आणि जिल्ह्यातील ग्रामीण भागात कृषीवैशिट्य असलेली गावे विकसित व्हावी, या पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अभिनव संकल्पनेतून ‘ मिशन जय किसान’ अभियानाचा कृषी महोत्सवात शुभारंभ करण्यात आला.

**३१ कोटी ९० लक्ष रुपयांच्या भाजीपाला संशोधन केंद्राला मान्यता :** ऐकार्जुना (ता. वरोरा) येथे २५ हेक्टर जमिनीवर ३१ कोटी ९० लक्ष रुपये खर्च करून भाजीपाला संशोधन केंद्र उभारण्यात येणार आहे. याबाबत राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी उद्घाटन कार्यक्रमात संशोधन केंद्राला मान्यता देण्यात आल्याचा आदेश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे सुपूर्द केला.

**पाच दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी:** पाच दिवस चाललेल्या कृषी महोत्सवात कृषी विषयक विविध चर्चासत्रे, परिसंवाद यांच्यासोबतच विविधि सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत आणली. सोबतच या कृषी महोत्सवात जवळपास विविध विभागाने ३५० स्टॉल लावले होते.

# शेती व्यवसायावरील अवकळा

**भारत हा कृषिप्रधान देश आहे. वर्षानुवर्षे अनादि काळापासून आपल्याकडे शेती हाच मुख्य व्यवसाय राहिलेला आहे. उच्च शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी ही म्हण त्यातूनच जन्माला आली असावी असे वाटते. अशी उच्च शेतीची परंपरा असलेल्या या शेती व्यवसायाला उतरती कळा का आली? याचे चिंतन करणे आवश्यक आहे. एकेकाळी या शेतीने समाजाला जगविले आहे. आजही जगवत आहे. पुढेही जगविणार आहे. शेतीला अजूनपर्यंत तरी अन्य पर्याय उपलब्ध नाही. उपाशी माणसाच्या पोटात दोन घास अन्न भरविण्याचे आणि त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दाखविण्याचे सामर्थ्य केवळ शेतीतच आहे.**




या व्यवसायाने पोटात दोन घास भरविण्याचे कौशल्य दिले आहे. असे म्हणतात की, हा व्यवसाय प्रामाणिकपणे जर केला तर माणूस उपाशी मरणार नाही. आजही वडिलधाऱ्या मंडळीच शेतीवर फार प्रेम आहे. ते सांगतात नोकरी नाही लागली तर आपली शेती आहेच. घरी शेती कर, तिची मशागत कर, सेवा कर. तिच्यावर माया लाव. तुला कुठे कमी पडू देणार नाही. एका दाण्याचे चार दाणे करण्याची किमया फक्त शेती व्यवसायातच आहे. त्यामुळे या व्यवसायाची सर दुसऱ्या कोणत्याही व्यवसायाला येत नाही. एका कुटुंबाला जगवून शेजाऱ्यांनाही जगण्याची ताकद फक्त आणि फक्त या शेती व्यवसायातच आहे. पण दुर्दैवाने याच शेतीकडे आज मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत आहे. एक नुकसानीचा आणि त्रुटीचा व्यवसाय म्हणून आज शेती व्यवसायाकडे बघितले जाते. अलीकडे कुणीही खुशीने शेती करताना दिसत नाही. कारण शंभराचे सव्वाशे होण्याऐवजी साठच होत असल्याने अनेकांनी याकडे पाठ फिरविली आहे. फिरवली जाणारी पाठ ही दुर्दैवाने चिंतेची बाब आहे. वाढत्या महागाईतला झोपविण्याची क्षमता फक्त शेती व्यवसायातच आहे. तरीही आपण शेतीकडे का लक्ष देत ज नाही? ज्यांच्याकडे शेती आहे त्यांचा शेती मोडण्याकडे कल वाढत चालला आहे. ग्रामीण भागात अनेक शेत्या बंजर पडलेल्या दिसतात. ज्या वापरात आहे त्यातही मन लावून तिथे मशागत केली जात नाही. याचे कारण हा व्यवसाय नफा देईल असे वातावरण राहिलेले नाही. शेतीमध्ये पूर्वी नैसर्गिक खतांचा वापर केला जायचा. घरीच तयार केलेली बी बियाणे वापरली जाऊन ती शेतात पेरली जायची. आणि कौटुंबिक समन्वयातून केल्या जाणाऱ्या मशागतीने शेतीतून निश्चितच फायदाच फायदा व्हायचा. परंतु अलीकडे शासन रासायनिक खताचा वापर करण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करत आहे. अनेक सुप्रसिद्ध नट, नट्यांचा जाहिरातीत वापर करून त्यांच्या माध्यमातून रासायनिक खतांची विक्री केली जाते. दूरदर्शन, वर्तमानपत्रे, फ्लेक्स यावर दिसणारी जाहिरात बघून शेतकरीही त्याकडे आकर्षित होतो. रासायनिक खते व कृषी केंद्रातून बी बियाणे आणून शेतात लागवड करतो. रासायनिक शेती कशी करावी याचे तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे पीक कमीकमी होते. राज्यात अनेक कृषी विभाग आहेत. राज्य शासनाचा कृषी विभाग, जिल्हा परिषदेचा कृषी विभाग, तालुकास्तरावर सारे तज्ज्ञ अधिकारी व कर्मचारी यांनी तुडुंब भरलेली कार्यालये असतांनाही शेतकऱ्यांना पाहिजे तसे योग्य मार्गदर्शन दिले जात नाही. मदत केली जात नाही. परिणामतः शेतीची मशागत झाल्यानंतर पेरणी कशी करायची? त्या पिकाची काळजी कशी घ्यायची? फवारणी केव्हा करायची? कुठला आजार आल्यावर कुठलं औषध फवारायचं? याचं तांत्रिक ज्ञान नसल्याने शेतकरी आपल्या स्वतःच्या मर्जीने वा चार चौघांचा सल्ला ऐकून शेतीची मशागत करतो. पिकांची काळजी घेतो. परिणामतः त्यात चुकीचे झाले की मालाच्या उताऱ्यामध्ये फरक पडतो. शेती लाभार्थी कोलमडतो.

या निमित्ताने एक प्रश्न पडतो की महाराष्ट्र शासनाची विविध प्रकारची कृषी कार्यालये असताना या कृषी अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची गरज का भासत नाही. आजवर कृषी अधिकारी शेताच्या बांधावर जाऊन व गावात येऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात हे असे चित्र अपवादात्मक प्रसंग सोडले तर कधीच बघायला मिळाले नाही. खरं म्हणजे शेतकऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या घरी जाऊन, गावोगावी जाऊन शेतकऱ्यांना जागृत करायला पाहिजे. कृषिविषयक नवीननवीन शोध लोकांना सांगायला पाहिजे. माहीती द्यायला पाहिजे. कमी खर्चात शेती कशी चांगल्या पद्धतीने पिकविता येईल याचं ज्ञान द्यायला पाहिजे. ही कृषी कार्यालये ज्या दिवशी प्रामाणिकपणे आपली कामे करतील त्याच दिवशी शेती व्यवसायात बरकत दिसेल. परंतु ही कृषी कार्यालये म्हणजे आज पांढरा हत्ती झालेले आहे. केवळ कार्यालयात बसून कागदोपत्री घोडे नाचविणारी ही कार्यालयीन जमात केवळ शोभेची वस्तू झालेली आहे. ज्या शेतकऱ्यांच्या हिताची जबाबदारी यांच्याकडे आहे त्याचे यांना काही वाटत नाही. केवळ कागदावर बैठका दाखवून, केवळ कागदावर शासकीय कार्यक्रमाची अंमलबजावणी दाखवून, कागदोपत्री भेटी दाखवून खोटे अहवाल पाठविणारी ही कारकुनी जमात केव्हा सुधरेल हे सांगायला नेम नाही. शेतकरी हीत लक्षात घेता काहीतरी ठोस उपाययोजना शासनाने काढायला पाहिजे. जेणेकरून कार्यालयात बसून खुर्चा तोडणारे हे कृषीअधिकारी व त्यांच्या हाताखाली काम करणारे त्यांचे सहकारी बांधावर कसे पोहोचतील. प्रत्यक्ष कृतीतून नियोजन कसे करतील. शेतीविषयी मार्गदर्शन करतील याचं नियोजन प्रत्यक्षात साकार होईल अशा पद्धतीने कार्याची अंमलबजावणी व्हायला पाहिजे. शासनाच्या शेतीविषयक विविध प्रकारच्या योजना घराघरांत प्रामाणिक पोहचवण्याची जबाबदारी कृषी विभागांची आहे. असे झाले तरच कृषी क्षेत्र पुढे जाईल आणि नुकसान वाचेल. शासनाने प्रत्यक्ष जमिनीवर जाऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी केवळ दिखाऊ नव्हे तर टिकाऊ योजना राबविण्याची गरज आहे. परंतु दुर्दैवाने लोकप्रियतेसाठी सरकारही दिखाऊपणाकडे जास्त लक्ष देत. हे जर टाळता आले तर शेती नक्कीच फायद्यामध्ये येईल. शासनाने यासाठी समर्पक पावले उचलली नाही तर पुढे येणाऱ्या काळात शेती व्यवसाय केवळ नावापुरताच उरेल अशी भीती वाटायला लागलेली आहे. या देशाला सोने की चिडिया जर करायची असेल, कृषी क्षेत्रातील गेलेले ते चांगले दिवस पुन्हा परत येणे आवश्यक आहे. त्यासाठी कृषी कार्यालये, शेतीचे जाणकार, तज्ज्ञ व शेतीची आवड असणाऱ्या लोकांच्या मार्गदर्शनाची नितांत गरज आहे. शासकीय ध्येय धोरणे अनेक असली तरी ती शेतीनुरूप कशी होईल याकडे दुर्लक्ष होता कामा नये. असे जर झाले नाही तर एक दिवस शेती इतकी लयास जाईल की कोणीही शेती करायला समोर येणार नाही.शेती आणि शेतकरी लुप्त होईल.

# नागपूर-अमरावती विभागाच्या जिल्हा वार्षिक योजनांचा (सर्वसाधारण)

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताची अर्थव्यवस्था जगातल्या 'टॉप-५'वर पोहोचली आहे. येत्या काळात देशाची अर्थव्यवस्था 'पाच ट्रिलियन' डॉलर करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे उद्दीष्ट आहे. हे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राने 'एक ट्रीलियन' डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आपले प्रयत्न सुरु असून प्रत्येक जिल्ह्यांनी आपल्या जिल्ह्यात खासगी गुंतवणुक आकर्षित करणे, निर्यात वाढविणे तसेच राज्यासह केंद्राच्या योजनांचा अभिसरणाद्वारे अधिकाधिक निधीचा वापर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिले. विदर्भात पर्यटन विकासाला अमर्याद संधी आहेत, विदर्भातील पर्यटनाला चालना देण्यासाठी नागपूरसह अमरावती विभागातील महत्वाच्या पर्यटन क्षेत्रांची एकत्रित सांगड घालून टुरिझम सर्किट विकसीत करण्याच्या सूचना त्यांनी आज दिल्या.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजनेची (सर्वसाधारण) राज्यस्तरीय बैठक मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी विदर्भातील नागपूर व अमरावती विभागातील अकरा जिल्ह्यांचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला. याबैठकीला व्हिसीद्वारे चंद्रपूर व वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, अमरावतीचे पालकमंत्री चंद्रकात पाटील, अकोल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, बुलडाण्याचे पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील (प्रत्यक्ष उपस्थित), गोंदियाचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम, भंडाऱ्याचे पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावीत, यवतमाळ व वाशीम जिल्ह्यांचे पालकमंत्री संजय राठोड (प्रत्यक्ष उपस्थित), भंडाऱ्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष गंगाधर जिभकाटे, गोंदीयाचे जि. प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, अकोल्याच्या जि. प. अध्यक्षा संगीता अडाऊ, वाशीमचे जि. प. अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांच्यासह नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय (प्रत्यक्ष उपस्थित), नागपूरचे पालकसचिव असीम गुप्ता (प्रत्यक्ष उपस्थित), वर्धा जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. अनुपकुमार यादव, नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, अमरावतीच्या विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय, नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. बिपीन इटनकर, वर्ध्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, भंडाऱ्याचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, गोंदीयाचे जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, चंद्रपूरचे प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, गडचिरोलीचे जिल्हाधिकारी संजय मीणा, अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटीयार, अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुमार, यवतमाळचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, बुलडाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, वाशिमच्या जिल्हाधिकारी भुवनेश्वरी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, संबंधित लोकप्रतिनिधी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला जिल्हा वार्षिक योजनांमधील निधी खर्चाचे प्रमाण अल्प राहून त्यामध्ये वर्षाच्या अखेरीस मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यांनी वित्त विभागाने निधी वितरीत केल्यानुसार निधी खर्चाचे प्रमाण राहील याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. निधी वेळच्यावेळी खर्च करतानाच विकासकामे दर्जेदार पध्दतीने पूर्ण करावीत.

**केंद्राच्या महत्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी साहेबांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र सरकारच्या अनेक महत्वाकांक्षी योजना सुरु आहेत. या योजना निती आयोगाच्या माध्यमातून सनियंत्रित करण्यात येत आहेत. या योजनांमध्ये प्रधानमंत्री पोषण अभियान, प्रधानमंत्री स्कूल रायझिंग इंडिया, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, अमृत योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, जल जीवन मिशन, हर घर जल, ट्रॅव्हल फॉर लाईफ, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आदींचा समावेश आहे. या केंद्राच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

**आकांक्षित जिल्ह्यांसह तालुक्यांना भरघोस निधी**

राज्यातील गडचिरोली, नंदुरबार, वाशीम, धाराशिव या जिल्ह्यांचा आकांक्षित जिल्ह्यात समावेश होतो. या जिल्ह्यांव्यतीरिक्त अमरावती, बीड, चंद्रपूर, हिंगोली, जालना, नांदेड, नाशिक, पालघर, सोलापूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांतील अठरा तालुक्यांचा आकांक्षित तालुक्यात समावेश होतो. या जिल्ह्यांच्या आणि तालुक्यांच्या विकासासाठी २५ टक्के निधी राखून ठेवण्यात येतो. या जिल्ह्यांच्या आणि तालुक्यांच्या निर्देशांकात वाढ करण्यासाठी या निधीचा वापर करण्यात यावा. या आकांक्षित जिल्ह्यासह तालुक्यांना भरघोस निधी देण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

**केंद्रासह राज्याच्या निधीचे प्रभावीपणे अभिसरण करा**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरवर नेण्याचे आपले उद्दीष्ट आहे. हे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यांनी आपल्या जिल्ह्यात खासगी गुंतवणुक आकर्षित करणे, निर्यात वाढविणे तसेच राज्यासह केंद्राच्या योजनांच्या अभिसरणाद्वारे निधीचा अधिकाधिक वापर करावा. त्याचबरोबर जिल्हा वार्षिक योजनेमध्ये देण्यात आलेला निधी प्राधान्याने सामाजिक क्षेत्रातील विविध योजनांवर विशेषत: शिक्षण, आरोग्य, पर्यटन, महिला व बाल कल्याण, कृषि, मृद व जलसंधारणाच्या क्षेत्रात खर्च करावा.

**'डिपीसी'च्या माध्यमातून गत वेळपेक्षा वाढीव निधी**

जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक जिल्ह्यांनी विविध यंत्राणांकडून आलेल्या मागणीनुसार निधीची मागणी केली आहे. जिल्ह्यांची लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रावर आधारीत तयार करण्यात आलेल्या सूत्रानुसार निधीचे वितरण करण्यात येईल. तथापि गतवर्षी जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून देण्यात आलेल्या निधीपेक्षा यंदा अधिकचा निधी देण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

**विकासकामांच्या गुणवत्तेत तडजोड नको**

राज्य सरकार जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यांना देत असलेला निधी हा सर्वसामान्यांच्या कराच्या पैशातून देण्यात येतो. त्यामुळे या निधीचा विनियोग योग्य पध्दतीने झाला पाहिजे. जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या कामांच्या गुणवत्तेत कोणत्याही प्रकारची तडजोड करु नये, प्रत्येक काम गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

**विदर्भात टुरिझम सर्किट उभारा**

विदर्भात पर्यटनाच्या अमर्याद संधी आहेत. सर्वाधिक व्याघ्र प्रकल्प नागपूर विभागात आहेत. व्याघ्र प्रकल्पाच्या सफारीसाठी पर्यटक मोठ्या संख्येने विदर्भात येत असतात. त्यांना अधिकच्या सुविधा देतानाच, या सर्व पर्यटनकेंद्रांना जोडून टुरिझम सर्किट उभारण्यात यावे. यवतमाळच्या टिपेश्वर अभयारण्य, मेळघाट यांसारख्या पर्यटन क्षेत्रांना अधिकची सुविधा देण्याबरोबरच त्यांची अधिक प्रभावीपणे प्रचार आणि प्रसिध्दी करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

# पंचशील धम्मध्वज दिन साजरा



**धामणगाव रेल्वे**–जानेवारी रोजी धामणगाव रेल्वे शहरात जागतिक पंचशील धम्म ध्वज दिन नगर परिषद प्रांगणात असलेल्या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व पंचशील धम्म ध्वजाला मानवंदना देण्यात आली व जागतिक बौद्ध धर्म परिषदेत ८ जानेवारी रोजी पंचशील धम्म ध्वजाला स्विकारले.आज संपूर्ण जगामध्ये पंचशील धम्म ध्वज दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. त्यांचाच एक भाग म्हणून धामणगाव रेल्वे शहरातील बौद्ध उपासक व उपासिका यांनी पंचशील धम्म ध्वज दिन साजरा केला या मध्ये प्रामुख्याने प्रशांत मुन.जोत्यी पाटील.मुकेश अर्जुने.धिरज भैसारे. डॉ पवन झटाले. ॲड आनंद माने . आदित्य शंभरकर.प्रशिक राऊत.सागर रोकडे.मनिष शेलारे सह बौध्द उपासक उपस्थित होते.

# शांत बसून सहन करण्यास अधिक ताकद लागते : अरेला कारे करणे सोपे असते

## खासदार सुप्रिया सुळेंचा अजित पवारांना टोला

**पुणे**–ज्येष्ठ नेते शरद पवार हे ८४ वर्षीय माणूस राजकारनात जिद्दीने लढत आहे याबाबत सर्वांना अभिमान असला पाहिजे. शरद पवार यांची राजकीय कारकिर्द मोठी असून ती जनतेने पहिली आहे. आपल्यापेक्षा मोठ्या माणसावर मी बोलत नाही तसे संस्कार माझ्यावर नाही. शांत बसून सहन करण्यास अधिक ताकद लागते, अरेला कारे करणे सोपे असते.अजितदादा ज्येष्ठ नागरिक असून त्यांचे ६५ वय असल्याने त्या वयाने आमदार रोहित पवार हे बच्चा आहे. दादा हे काकाचा अधिकाराने त्याला तसे म्हणाले असतील. रोहितच्या वयात शरद पवार हे मुख्यमंत्री होते. माझ्यापेक्षा दादा हे दहा वर्षांनी मोठे आहे, माझा पती देखील ६० वर्षाचे असल्याने ते ज्येष्ठ नागरिक असून त्याबाबत वेगळे काही वाटले नाही पाहिजे, असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी प्रवक्ते अंकुश काकडे उपस्थित होते.सुळे म्हणाल्या, पुणे मनपा आयुक्त यांना मी महिन्यातून एकदा भेटत असते कारण माझ्या मतदारसंघातील काही भाग पुण्यात असून नागरिकांचे प्रश्न मांडावे लागतात. लोकप्रतिनिधी आणि सत्ता नसल्याने नागरिकांचे प्रश्न दुर्देवाने सुटत नाही. आज अनेक महिने न्यायालयात केस दाखल आहे पण सत्ताधारी निवडणूक घेण्यास उत्सुक नाही. त्यामुळे विकासकामात अडचणी निर्माण होत आहे. पाणी, कचरा, रस्ते, वाहतूक समस्या प्रश्न यामुळे नागरिक त्रस्त आहे.नागरिकात नाराजी कारण कर भरून आवश्यक पायाभूत सुविधा मिळत नाही. नगरसेवक नसल्याने नागरिक कोणाकडे जाऊ शकत नाही. त्यामुळे याचा पाठपुरावा आम्ही



सातत्याने करत आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे मी मागणी केली की, राज्यात पाण्याचा प्रश्न बिकट असून त्याबाबत उपययोजना करणे आवश्यक आहे. अनेक धरणे राज्यात त्यात पाणी साठा कमी होऊ लागला आहे. शहरातील नवीन बांधकाम करताना पाणी आणि कचरा बाबत योग्य धोरण राबविण्यात येत नाही. राजकारण बाजूला ठेऊन बैठक घेऊन चर्चा करून मार्ग काढला पाहिजे.लोकशाही असल्याने मी मुख्यमंत्री यांना विनंती करते की, शासन आपल्या दारी मधील दाखले हे स्थानिक पातळीवर दिले जाऊ शकतात. मुख्यमंत्री यांनी त्यांचा महत्वपूर्ण वेळ वाया न घालवता तसेच या उपक्रमात पैसे नाहक खर्च घालण्यापेक्षा चांगल्या ठिकाणी खर्च करावेत. महविकास आघाडी काळात कोविड मध्ये आम्ही कोणाला काही कमी पडू दिले नाही. जलजीवन मिशन आढावा घेतला असता अमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते.

सह्याद्रीचा राखणदार



### तलाठी भरती गैरप्रकाराची SIT मार्फत चौकशी करण्यात यावी यासाठी

# विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आली-अरविंद वलेकर





**सांगोला । प्रतिनिधी**

राज्यात नुकतीच झालेली तलाठी भरती प्रक्रिया अनेक गैरप्रकारामुळे पेपर सुरू झाल्याच्या पहिल्या दिवसापासून चर्चेत होती.काही दिवसापूर्वी खुद्द पोलीस विभागाच्या आरोप पत्रामध्ये नागपूर परीक्षा केंद्रावरून प्रश्न पाठवण्यात आल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे तलाठी भरतीचा पेपर फुठल्याचे प्रथमदर्शनी अंतिम निश्चित झाले आहे .तसेच संभाजीनगर परीक्षा केंद्रावरती काही परीक्षार्थींना उत्तरे पुरवताना पर्यवेक्षकाला अटक करण्यात आली आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये झालेल्या तलाठी भरती मध्ये जी अंतिम नावे निवड यादीत येईल त्यां सर्वांचे सीसीटीव्ही फुटेज चेक करण्यात यावे .सध्या प्रसिद्ध झालेल्या आलेल्या गुणवत्ता यादीवरून प्रथमदर्शनी नॉर्मलायझेशनमुळे तलाठी पेपर हा २०० मार्क पेपर असतो परंतु २०० हून अधिक मार्क अनेक उमेदवारांना मिळालेले आहेत यात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे सरळ सरळ दिसून येत आहे तसेच अनेक ठिकाणी पेपर फुटल्याचे सुद्धा अनेक वर्तमानपत्रातून निदर्शनास आले आहे तरी वरील सर्व झालेल्या गैरप्रकारची SIT मार्फत सदोष चौकशी करण्यात येऊन दोषी आढळलेल्या आरोपींवरती कडक कारवाई करण्यात यावी व त्यानंतरच अंतिम निकाल लावावा. या तलाठी भरतीमध्ये राज्यातील परीक्षा दिलेल्या आठ लाख हून अधिक उमेदवारांचे नुकसान होत आहे. त्यामूळे प्रामाणिक विद्यार्थ्यांना न्याय द्यावा हीच विनंती तसे न झाल्यास राज्यभर उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल अशी माहिती विशेष समाज कल्याण चे उपाध्यक्ष अरविंद आण्णासो वलेकर यांनी दिली यावेळी डॉ .नितिन आंधळे आदित्य वगरे अमोल साळवे मोहिते उपस्थित होते.

## सोलापुरात १९२१ मध्ये गाजलेली जकात चावडी



**सोलापुर :** मंगळवार पेठेत १९२१ साली भीषण आग लागली. यात अनेक दुकानांसह आठ ते दहा घरे भस्मसात झाली. त्यावेळी प्रशासनाने महत्त्वाची योजना आखत रस्ता रुंद केला. यावेळची जकात चावडी योजनाही खूप गाजली.

नगरपालिकेने या दोन योजना दिशादर्शक ठेवत भविष्यातील बहुतांश सर्वच नियोजन केले.मंगळवार पेठ ही शहराची पूर्वापार चालत आलेली बाजाराची मुख्य पेठ, रस्त्यावर रहदारी, दुकानांची गर्दी खूप, घरे एकमेकास चिकटून बांधलेली, काही २ मजली अथवा ३ मजली, रस्ता हल्लीच्या मानाने अरुंद अशी स्थिती होती.तांबट गल्लीतील (भांडे गल्ली) घरे घ्यावी, ३० फूट रुंदीचा रस्ता करावा व मारुतीचे देवळामागील हौद व कट्टा काढून टाकावा, देवळाच्या बाहेरील पायऱ्या काढून व्हरांड्याच्या कोपऱ्यावर गोलाई घ्यावी अशा सूचना पुढे आल्या. रस्ता रुंदीसाठी जरूर तेवढी घरे घेताना, इतरही जादा जागा ॲक्वायर करावी व रस्ता रुंदीकडे जाऊन उरलेल्या भागात प्लॉट पाडावेत असे या यावेळी नगरपालिकेने धोरण आखले.ही योजना फार खर्चाची ठरली. मंगळवार पेठेत सध्याच्या पोलिस चौकीसमोर रस्त्याच्या मध्यभागी ही जकात चावडीची दुमजली इमारत होती. भोवताली लहान लहान दुकाने होती. रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या या जुन्या इमारतीमुळे रहदारीलाही अडथळा होई. त्यामुळे ही इमारत पाडून टाकण्याचे व दुकाने ताब्यात घेण्याचे नगरपालिकेने ठरविले.पादचाऱ्यांनाही अडथळा होत होता. शेवटी चावडीलगतची १२ दुकाने नगरपालिकेने २४ हजार ८७२ खर्च करून ताब्यात घेतली. मुळात ॲक्विझिशनचा खर्च १२ हजार येईल, असा अंदाज होता. परंतु जास्त खर्च येऊ लागल्याने सरकार-मदतीची याचना करण्यात आली, व सरकारी ठराव होत १२ हजार ८०० रुपयांची ग्रँट मंजूर झाली.या मदतीमुळे नगरपालिकेला चावडी व दुकाने हलविणे शक्य झाले. तुळजापूर वेस, मारुती मंदिरासमोर एक जकात नाका होता. आता दैवज्ञ मंगल कार्यालय आहे त्याच्या बाजूला एक नाका होता, तेथे म्युनिसिपलचे कारकून वसुली करताना मी पाहिले आहे.


## बार्शी शहरात नवे दोन कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण

**बार्शी :** शहरातील सुभाषनगर आणि चोरमुले प्लॉटमध्ये राहणाऱ्या महिला त्रास जाणवल्याने शासकीय रुग्णालयात तपासणीसाठी आल्यानंतर त्यांची आरटीपीसीआर तपासणी केली असता त्यांचा अहवाल कोरोना पॉझिटिव्ह आल्याने शहरात आरोग्य क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे आरोग्य प्रशासन खडबडून जागे झाले आहे.मागील एक महिन्यांपासून शासनाने शासकीय रुग्णालयात आरटीपीसीआर व रॅपिड अँटिजन टेस्ट करण्याचे सुरवात केली आहे. ताप, सर्दी, खोकल्याचा त्रास होत असल्याने दोन महिला शासकीय रुग्णालयात औषधोपचारासाठी गेल्या होत्या.त्यावेळी त्यांची कोरोना टेस्ट केली असता शनिवारी (ता.६) त्या कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्या आहेत. दरम्यान, शनिवार व रविवारी आशावर्कर, आरोग्य सहाय्यक, परिचारिका पथक संबंधित भागामध्ये तपासणीसाठी पोचले असून ज्या महिलेची टेस्ट पॉझिटिव्ह आली आहे.ती नुकतीच प्रसूती झाली आहे. त्यांची तपासणी केली.कुटुंबातील व्यक्ती, त्यांच्या संपर्कात आलेल्या इतर व्यक्तींची, शेजारी राहणाऱ्यांची तपासणी करण्यात येत असून कोरोना पॉझिटिव्ह आलेल्या रुग्णांना पंधरा दिवस होम आयसोलेशनमध्ये ठेवण्यात येणार आहे.




## सोलापूर जिल्ह्यातील १८५५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ

**मोडनिंब :** उच्च माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती (इ.५ वी व इ.८ वी) धारकांची माहिती अद्ययावत करण्याचे आदेश शिक्षण संचालकांकडून देण्यात आले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील १८५५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याचा मार्ग यामुळे मोकळा होणार आहे.२०१७ ते २०२१ या कालावधीतील विद्यार्थ्यांचा बँक खाते क्रमांक, आयएफएससी कोड, आधार क्रमांक या कागदपत्रांची माहिती शाळा स्तरावर संगणकीकृत करण्यात आली. परंतु, या कागदपत्रातील त्रुटीमुळे जिल्हाभरातून अनेक विद्यार्थी अनेक वर्ष शिष्यवृत्तीच्या लाभापासून दूर आहेत.२०१७ पासून विद्यार्थ्यांची माहिती शाळा स्तरावरच संगणकीकृत करण्यात आली. परंतु यात अनेक दोष आढळून आल्याने शिष्यवृत्तीचे पैसे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा झाले नाहीत. बँकांच्या आयएफएससी कोड मध्ये 'शून्य' आणि 'ओ' यामध्ये गफलत झाल्याचे आढळून आले. या संदर्भात 'सकाळ'नेही पाठपुरावा केला होता.संबंधित विद्यार्थ्यांची अद्ययावत माहिती ३१



जानेवारी पूर्वी संगणकीकृत करण्याचे आदेश शिक्षण संचालक डॉक्टर महेश पालकर यांनी दिले आहेत. यासोबतच २०२२ व २३ या वर्षातील माहितीही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर तातडीने भरण्याचे आदेश मुख्याध्यापकांना देण्यात आले आहेत.शिक्षण अधिकारी (योजना) सुलभा वठारे यांनी यासंदर्भात सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने २०१७ पासूनची विद्यार्थ्यांची माहिती संगणकीकृत करणे सुरू केले. या आधारावरच सोलापूर जिल्ह्यातून १८५५ विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्याचे आढळले. राज्यभरात ही संख्या हजारोंच्या घरात आहे.परंतु, प्राप्त माहितीनुसार जवळपास २००६ पासूनचे अनेक विद्यार्थी या लाभापासून वंचित आहेत. यावेळी संगणकीकरण न झाल्याने शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे कागदोपत्री प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे दिले गेले.यातील अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती चा लाभ मिळाला नाही. या प्रश्नावरही शिक्षण विभागाने मार्ग काढावा अशी मागणी या काळातील शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थ्यांकडून केली जात आहे. १६ वर्षानंतर लाभ मिळेल.शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी, पालकांनी आपल्या बँक खात्याची माहिती अद्ययावत करून घ्यावी. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना शासनाने ही संधी निर्माण करून दिली आहे. पालकांनी गटशिक्षणाधिकारी अथवा मुख्याध्यापकांकडे संपर्क साधून ३१ जानेवारी पूर्वी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. यासंबंधीच्या सूचना पंचायत समिती स्तरावर देण्यात आल्या आहेत.

# रोजगार मेळाव्यातून अनेकांचे संसार उभा करू शकलो याचा मनस्वी आनंद-आ.दिपकआबा साळुंखे पाटील

### आबांच्या जन्मदिनी आयोजित रोजगार मेळाव्याला प्रचंड यश ; हजारो तरुणांच्या हाताला मिळाले काम

**सांगोला । प्रतिनिधी**

गेली अनेक वर्ष सार्वजनिक जीवनात काम करत असताना पक्ष पार्टी, जात-पात आणि राजकारण बाजूला ठेऊन नेहमीच मी तळागाळातील कार्यकर्त्यांचा प्राधान्याने विचार केला आणि समाजकारणाला महत्त्व दिले. वाढदिवसानिमित्त आयोजित रोजगार मेळाव्यातून सांगोला तालुक्यातील हजारो बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देत त्यांचे संसार उभा करू शकलो याचा मला मनस्वी आनंद आहे असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा. आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी केले.माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार दि ७ जानेवारी रोजी भव्य रोजगार मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यासाठी देशातील नामांकित अशा यशस्वी फाऊंडेशन या संस्थेने पुढाकार घेतला होता. सांगोला तालुक्यात प्रथमच आयोजित रोजगार मेळावा प्रचंड हिट ठरला असून यामध्ये तब्बल ३ ते ४ हजार तरुणांनी आपली नाव नोंदणी केली होती. या मेळाव्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या सिरम इन्स्टिट्युट, फिनोलेक्स, महिंद्रा यासारख्या अन्य ३७ नामांकित कंपन्या समाविष्ट होत्या. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांनी सांगोला विद्यामंदिर प्रशाला येथे पार पडलेल्या मेळाव्यात



शैक्षणिक पात्रता पडताळून आणि मुलाखतीद्वारे निवड करून जागेवरच सुमारे ९५० तरुणांना आकर्षक पगारासह नामांकित कपन्यांनी नियुक्तीपत्र देऊन जागेवरच निवड केली. या निवडीमुळे हजारो तरुणांच्या चेहऱ्यावर हसू फुलले होते. नियुक्तीपत्र प्रदान करताना मा. आमदार दिपकआबा म्हणाले, ग्रामीण भागात अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आर्थिक विवंचना असताना शिक्षण घेऊनही तरुण तरुणींच्या हाताला काम नसल्याने बेरोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला होता हा प्रश्न मार्गी लावण्यासाठीच कार्यकर्त्यांनी हा भव्य रोजगार मेळावा आयोजित केला या मेळाव्यातून ज्या तरुणांना नोकरी मिळाली त्यांनी आपल्या संस्थेत किंवा कंपनीत प्रामाणिक पणे काम करून आपल्या कुटुंबाची जबाबदारी समर्थपने पार पाडावी आणि ज्यांना नोंदणी करून मुलाखत देऊनही नोकरी मिळाली नाही त्यांनी अजिबात निराश होऊ नये मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपनीमध्ये जेंव्हा जेंव्हा जागा उपलब्ध होतील तेंव्हा प्राधान्याने तुमचा विचार केला जाईल असेही शेवटी मा. आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी आवर्जून नमूद केले.

**पालकांच्या डोळ्यात आनंदाश्रू**

**शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने सांगोला तालुक्यात बेरोजगारीचा प्रश्न ज्वलंत होता. अशा परिस्थितीत दिपकआबांच्या वाढदिवसा निमित्त आयोजित मेळाव्यात ज्या तरुणांना नोकरी मिळाली त्यांच्या आणि पालकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले या मुले-मुली आणि पालकांनी डोळ्यात आनंदाचे अश्रू घेऊनच माजी आमदार दिपकआबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या हे चित्र अत्यंत भावनिक होते.**

# ‘अ’ वर्ग तीथेक्षेत्र दर्जा मिळाल्याने गुरूदेव भक्तांकडून सुधीर मुनगंटीवार यांचा सत्कार

## ना.मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे गुरुकुंज आश्रमाला ‘अ’ वर्ग दर्जा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अमरावती जिल्ह्यातील मोझरी येथील गुरूकुंज आश्रमाला राज्यशासनाने ‘अ’ वर्ग तीथेक्षेत्राचा दर्जा प्रदान केला आहे. या आश्रमाला हा दर्जा मिळावा, यासाठी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे गुरूकुंज आश्रमाला तीर्थक्षेत्राचा ‘अ’ वर्ग दर्जा मिळाल्याची भावना व्यक्त करीत अखिल भारतीय गुरूदेव सेवा मंडळाकडून ना.मुनगंटीवार यांचा सत्कार करण्यात आला आणि आभार व्यक्त करण्यात आले.





चंद्रपूर येथील गिरनार चौकातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात ना. सुधीर मुनगंटीवार यांचा अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम मोझरी यांच्यावतीने लक्ष्मणरावजी गमे यांच्या हस्ते व गुरुदेव सेवकांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे प्रा. कंठाळे, पद्माकर मलकापुरे, पद्माकर ठाकरे, डॉ. जयप्रकाश जयस्वाल, रुपलाल कावळे, सुभाष कासनगोट्टूवार, किशोर कापगते, दादाजी नंदनवार, ढवस, वसंतराव धंदरे, पुरुषोत्तम राऊत, आनंदराव मोझे, महादेव चिकरे, खिरडकर, आनंदराव मांदाडे, बबनराव अनमुलवार, देवराव बोबडे, अशोक भिडेकर, संतोष राऊत, रामराव धारणे, रामदाव उरकुडे, भास्कर भोकरे, उषा मेश्राम, माया मांदाडे, शुभांगी अलमुलवार, ऋषीजी गोहणे, गौरव दिवसे, संदिप झाडे, शिवदास शेंडे, चेतन कवाडकर, पोकोले, जगदिश हांडेकर, सुखदेव चोथाले, चित्रा गुरनुले, रजनीगंधा कवाडकर, कल्पना गिरडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुनगंटीवार यांनी पुढाकार घेत लाखो गुरुदेव भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या अमरावती जिल्ह्यातील श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रमासाठी विशेष बाब म्हणून प्रयत्न केले नसते तर आश्रमाला सहजासहजी हा दर्जा मिळाला नसता, अशी भावनाही यावेळी व्यक्त करण्यात आली. ना. सुधीर मुनगंटीवार यांनी विविध संसदीय आयुधांचा वापर करत विधिमंडळात व विधिमंडळबाहेरही श्री क्षेत्र गुरुकुंजला विशेष बाब म्हणून अ-वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचे यावेळी गुरूदेव भक्तांनी नमूद करत आभार मानले.

**संघर्षाला यश मिळाल्याचा आनंद**

१९३५ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी गुरुकुंज मोझरी येथे आश्रम स्थापन केले. हे केवळ आश्रम नव्हे तर गुरुदेव भक्तांसाठी उर्जास्रोत आहे. यापूर्वी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे नाव नागपूर विद्यापीठाला मिळावे म्हणून व आता गूरूकुंज आश्रमाला अ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळावा म्हणून मी केलेल्या संघर्षाला व पाठपुराव्याला यश मिळाले याचा मला विशेष आनंद व अभिमान आहे. हे भाग्य मला तुम्हा सर्वांच्या शुभेच्छा व आशिर्वादाच्या बळावरच लाभले, अशी प्रतिक्रिया ना. मुनगंटीवार यांनी सत्कार प्रसंगी दिली.

**राष्ट्रसंतांवर चित्रपटही येणार**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर चित्रपट काढण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. लवरकच हा चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार असल्याची माहिती देखील ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

# १५१०० टोल-फ्री क्रमांकावरुन मिळवा मोफत कायदेविषयक सल्ला

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली मार्फत राष्ट्रीय विधी सेवा दिनानिमित्त १५१०० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे. या क्रमांकावर फोन करून कायदेविषयक सल्ला हवा असल्यास तज्ञ वकिलांमार्फत दिला जातो. सदर टोल-फ्री क्रमांकाचा लाभ भारताचा कोणताही नागरीक सहजपणे घेऊ शकतो.जिल्ह्यातील नागरीकास कायदेविषयक सल्ला हवा असल्यास त्याने टोल-फ्री क्रमांकावर फोन करावा. त्यानंतर राहत असलेले राज्य, जिल्हा व तालुक्याची निवड करावी. तसेच संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय येथील पॅनलवर कार्यरत असलेल्या वकिलांशी फोनवरून संपर्क करता येऊ शकतो. याकरीता महिला किंवा पुरुष वकील असा विकल्प सुद्धा उपलब्ध आहे.सदर सेवा कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू असणार आहे. ज्या व्यक्तींना प्रत्यक्ष कार्यालयात येणे शक्य नाही किंवा केवळ सल्ला स्वरूप कायदेविषयक माहिती हवी आहे, अशांनी सदर सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी केले आहे.

# प्रथम स्मुर्ती दिनानिमित्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**मूल । प्रतिनिधी**

मूल तालुक्यातील गडीसूर्ला येथील रमेशराव निकुरे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त सोनेरी ध्येय बहुउद्देशीय संस्था चा वतीने गडीसूर्ला येथील जिल्हा परिषद शाळा मध्ये नोटबुक वितरण करण्यात आले. यावेळी सोनेरी ध्येय बहुउद्देशीय संस्था चे अध्यक्ष रोहित निकुरे, गोविंदा निकुरे,पराग ढोले,प्रमोद शहारे,अमित निकुरे,मयूर निकुरे, अनिल निकुरे,मोहित शेंडे,अभिषेक आवळे,सचिन शेंडे रेनीशकुमार, नमन निकुरे,राजकुमार निकुरे तसेच जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक कोवासे तथा शिक्षक, शिक्षिका कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



# सामाजिक संस्थांद्वारे राहुल देवडे यांचा वाढदिवस स्तुत्य उपक्रमांनी साजरा

**वरोरा । प्रतिनिधी**

सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवून पारिवारिक सदस्यांसह वंचित, दुर्लक्षित, दिव्यांग समाज बांधवांच्या चेहऱ्यावरही हास्य फुलवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ता व आनंदवन मित्र मंडळाचे सदस्य राहुल देवडे, यांचा वाढदिवस आनंदवनातील सभागृहात स्नेह मीलन कार्यक्रमांतर्गत स्तुत्य उपक्रमांच्या आयोजनांनी सोत्साह संपन्न झाला.



कार्यक्रमात स्वरानंदवनाचे व्यवस्थापक सदाशिवराव ताजने, आनंदवन मित्र मंडळाचे वरोरा अध्यक्ष डॉ. प्रवीण मुधोळकर, ओशनिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा समाज कार्यकर्ता राजेंद्र मर्दाने, युवा नेते असिफ रजा, पोद्दार स्कुलचे संचालक सचिन बुरीले, पत्रकार प्रवीण गंधारे, खेमचंद नेरकर, बोर्डा ग्राम पंचायत सदस्य उमेश देशमुख ,व्हीडीओकॉन कंपनी कामगार यु,कोषाअध्यभ शरदजी ठेंगणे,आनंदवनाचे कार्यकर्ते दीपख शिव, शौकत खान आदी प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. मुधोळकर म्हणाले की, राहुल देवडे यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय असून त्या व्यतिरिक्त अन्य क्षेत्रातही त्यांचे भरीव योगदान आहे.यावेळी राजेंद्र मर्दाने म्हणाले की, राहुल देवडे यांनी अनावश्यक बाबींना फाटा देत वाढदिवस कार्यक्रम सहस्मरणीय ठरविला. आसिफ रजा यांनी देवडे यांच्या सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल तसेच संस्था राबवित असलेल्या विविध उपक्रमांबद्दल गौरवोद्गार काढले.स्वागताला उत्तर देताना राहुल देवडे म्हणाले की, सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवून वंचित समाजबांधवांच्या चेहऱ्यावर हास्य फुलण्यासाठी खारीचा वाटा उचलण्याचे काम आनंदवन मित्र मंडळ करीत आहे. माझा वाढदिवस बहुचर्चित दिव्यांग कलाकारांसोबत साजरा करण्याची संधी मला मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो, असे त्यांनी नमूद केले.स्वरानंदवनातील दिव्यांग कलाकारांनी विविध लोकप्रिय गीत व युगल डान्स सादर करीत राहुल देवडे यांना वाढदिवसाच्या भरभरून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी केक कापून राहुल देवडे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी स्वरानंदवनातील सर्व कलाकार व उपस्थितांनी वाढदिवस स्नेहमिलन अंतर्गत फराळाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रात कार्यरत किशोर देवडे, गजानन गायकवाड,आकाश खातरकर,रोशन बहादे, सुनिल झाडे, गणेश तांदुळकर, शुभम पवार, मोविन पठाण, मनीष गोचे, ओम राऊत, कशिश निखाडे, रोशन चव्हाण, पंकज ढोके, जितू यादव, त्रिशुल निबुधे, क्रिष्णा क्षीरसागर, अनिकेत चव्हाण इत्यादी आवर्जून उपस्थित होते.

# विवेकानंद महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती समारंभाच्या निमित्ताने ८ जानेवारी ते १२ जानेवारीपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ८ ते १० जानेवारी हे तीन दिवस विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. दिनांक ११ जानेवारी रोज गुरुवारला सकाळी १० वाजता गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ, वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान राहणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून गोंडवाना विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. सागर वझे व स्व. श्रीनिवास शिंदे मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट चंद्रपूर चे अध्यक्ष प्रा. धनराज आस्वले उपस्थित राहणार आहेत. याच दिवशी दुपारी १२ वाजता विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दुसऱ्या दिवशी दिनांक १२ जानेवारी रोज शुक्रवारी सकाळी १० वाजता स्वामी विवेकानंद जयंती व पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान असणार आहे. यावेळी लोक शिक्षण संस्था वरोरा चे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रा.धनराज आस्वले ,प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. तरी या सर्व उपक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एन. जी. उमाटे, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. विजय टोंगे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. संगीता बांबोडे यांनी केले आहे.

# हिंगणघाट तसेच समुद्रपूर तालुक्यातील शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

## आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक तसेच युवा कार्यकर्ते आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.

०८ जानेवारी रोजी हिंगणघाट, समुद्रपुर, सिंदी रेल्वे विधानसभा क्षेत्रातील हिंगणघाट तालुक्यातील पोहणा, ढीवरी पीपरी, सास्ती तसेच समुद्रपूर तालुक्यातील पारोधी व पिपरी येथील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.सदर प्रवेश सोहळ्याचे ०८ जानेवारी रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात आयोजन करण्यात आले.याप्रसंगी प्रामुख्याने जयवंत कुबडे, महेश नक्षीने, राजू झाडे, गोलू सकुलवार , दशरथ झाडे, प्रज्वल अंबाडरे, चंदू टापरे, संजय वानखेडे, राहुल चौधरी, किशोर शंभरकर, प्रमोद सोनटक्के, दिलीप डंभारे , टीकाराम अंबलकर, सुरेश ढाकणे, विनोद डंभारे, नामदेवराव डंभारे, सतीश सुर्वे, भोला निसाद, चंद्रास भोसले, प्रीतम शिंदे, मंगेश अंबादासजी राऊत, आकाश वाटे, निलेश



पुरे, निलेश राऊत, पवन भादाडे , अविनाश वाटे, लिकेत राऊत , कार्तिक ठाकरे, हनुमान कोहळे, अमोल राऊत, रतन राऊत, अरुण टापरे, अक्षय टापरे, नचिकेत येरेकार, सुनील येरेकर, परमेश्वर वाघाडे, मंगेश वाघाडे, हरिदास वाघाडे, बंडू वाघाडे, शंकर अरदपायरे, रामजी वाघाडे, जयंत नेहारे, राजेश्वर नेहारे, बालाजी नेहारे ,उत्तम शेंद्रे, बंडू वाघाडे, देविदास येरकाडे, भोजराज दाते, मारुती वाघाडे, महादेव अरदपायरे, सुधाकर गौरकार, छगन इंगळे, किसना मानकर, विनोद राऊत, गजानन ढोरके, विश्वास घोडे इत्यादी कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला.उपरोक्त कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.सदर कार्यक्रमाचे वेळी कार्यसम्राट आ.समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, भाजपा विधानसभा प्रमूख संजय डेहणे,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष छाया सातपुते, हिंगणघाट तालुका भाजपा अध्यक्ष विनोद विटाळे, समुद्रपूर भाजपा तालुका अध्यक्ष वामन चंदनखेडे, समुद्रपूर माजी नगराध्यक्ष गजानन राऊत, माजी पंचायत समिती सभापती गंगाधरराव कोल्हे , माजी पंचायत समिती सभापती योगेश फुसे, भाजपा हिंगणघाट शहर अध्यक्ष भूषण पिसे, कृषी उत्पन्न बाजार समिती समुद्रपूर संचालक घनश्यामजी येरलेकर, समाजसेवक सुनील डोंगरे ,महिला विधानसभा प्रमुख नलिनी सयाम, अनिता मावळे , विकास इंगळे, रवींद्र लढी, ललित डगवार, उमेश कोल्हे इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते सदर पक्ष सोहळा कार्यक्रमाला उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .